# उत्तरेकडील मैदानी प्रदेश -पशचिम (पंजाब व हरियाणा )

**‘अ’ स्तंभातील घटकांशी ‘ब’ स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा**

*१.

| | ‘अ’ स्तंभ | | ‘ब’ स्तंभ |
|---|---|---|---|
| i. | लुधियाना | अ. | पंजाब व हरियाणा राज्यांची राजधानी |
| ii. | जालंधर | ब. | पंजाब व हरियाणा मैदानातील मोठे शहर |
| iii. | चंदीगढ | क. | क्रीडासामग्रीचे केंद्र |
| | | ड. | शिखांचे पवित्र तीर्थस्थान |

**उत्तरे:** (i – ब), (ii – क), (iii – अ)

२.

| | ‘अ’ स्तंभ पिकांची नावे | | ‘ब’ स्तंभ पंजाबमधील % लागवडीखालील भाग |
|---|---|---|---|
| i. | गहू | अ. | ९ % |
| ii. | भात | ब. | २ % |
| iii. | कापूस | क. | १४ % |
| iv. | ऊस | ड. | ५ % |
| | | इ. | ३८ % |

**उत्तरे:** (i – इ), (ii – क), (iii – अ), (iv – ब)

३.

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| i. | अमृतसर [जुलै १६] | अ. | औष्णिक विद्युत केंद्रे |
| ii. | अंबाला | ब. | अन्नप्रक्रिया उद्योग |
| iii. | फरिदाबाद | क. | विज्ञान शहर |
| iv. | हरमंदीर साहिब [जुलै १५] | ड. | कृषी महाविद्यालय |
| | | इ. | शिखांचे पवित्र स्थळ |

**उत्तरे:** (i – ब), (ii – क), (iii – अ), (iv – इ)

## प्र.२. थोडक्यात उत्तरे लिहा. (स्वयंअध्ययनासाठी प्रश्न)

### ४.० प्रस्तावना

**१. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशाचे स्थान कोठे आहे?**

**उत्तर:** पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशाचे स्थान यमुना नदीच्या पश्चिमेला व राजस्थानच्या वाळवंटाच्या उत्तरेला आहे.

**२. इतिहासात पंजाब व हरियाणा या राज्यांवर कोणी आक्रमण केले?**

**उत्तर:** इतिहासात हूण, तुर्की, मोगल यांनी पंजाब-हरियाणा राज्यावर आक्रमण केले होते.

## ४.१ प्राकृतिक रचना

**३. 'चोस' कशाला म्हटले जाते?**

**उत्तर:** हंगामी छोटे नदीप्रवाह जे शिवालिक पर्वतरांगेतून वाहत येऊन पंजाब व हरियाणामध्ये त्यांचे जलनिस्सारण होते, त्यांना पंजाब व हरियाणामध्ये 'चोस' म्हटले जाते.

**४. दोआब म्हणजे काय?**

**उत्तर:** i. दोआब म्हणजे दोन नद्यांमधील जमिनीचा भाग.

ii. 'दो' म्हणजे दोन आणि 'आब' म्हणजे पाणी किंवा नदी.

## ४.२ हवामान

**५. 'लू' म्हणजे काय?**

**उत्तर:** i. पश्चिमेकडून वाहणारे उष्ण आणि कोरडे वारे म्हणजे 'लू' होत. हे वारे उत्तर भारताच्या पश्चिम भारतीय गंगेच्या मैदानी प्रदेशावरून वाहतात.

ii. हे जोरदार वारे विशेषत: मे आणि जून महिन्यांमध्ये वाहतात.

## ४.४ नैसर्गिक वनसंपत्ती आणि प्राणिजीवन

**६. पंजाब आणि हरियाणा राज्यात आढळणाऱ्या वृक्षांची नावे लिहा.**

**उत्तर:** निलगिरी, देवदार, बाभूळ, शिसव, किकर आणि ढाक हे वृक्ष पंजाब आणि हरियाणा राज्यांत आढळून येतात.

## ४.५ लोकसंख्या आणि वसाहती

**७. तीज म्हणजे काय?**

**उत्तर:** i. तीज हा सण हिंदू स्त्रियांचा उपवासाचा धार्मिक उत्सव आहे.

ii. हा सण हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे श्रावण महिन्यात येतो आणि हा उत्सव देवी पार्वतीला समर्पित केला आहे.

**८. बैसाखी म्हणजे काय?**

**उत्तर:** i. सौर वर्षाची सुरुवात बैसाखी या उत्सवाने होते.

ii. उत्तर प्रदेश व पंजाबमधील लोक चांगले पीक आल्याबद्दल देवाला धन्यवाद देतात.

iii. शीख लोकांमध्ये बैसाखीला विशेष महत्त्व आहे.

iv. १६९९ मध्ये याच दिवशी शिखांचे १० वे गुरू गोविंदसिंहजी यांनी खालसा पंथाची स्थापना केली.

## ४.६ आर्थिक विकास

**९. 'हरितक्रांती' म्हणजे काय?**

**उत्तर:** i. उच्च प्रतीचे बियाणे आणि चांगल्या प्रतीची खते आणि सिंचन प्रक्रियेचा वाढता वापर या सगळ्यांच्या एकत्रित प्रक्रियेमुळे कृषी विकास होत आहे. त्याला 'हरितक्रांती' असे म्हणतात.

ii. हरितक्रांतीच्या अस्तित्वामुळे पिकाचे उत्पादन वाढले. त्यामुळे भारत देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला.

**१०. भारतातील हरितक्रांतीत पंजाब व हरियाणा मैदानी प्रदेशाच्या योगदानाचे वर्णन करा.**

**उत्तर:** i. हरितक्रांतीमुळे देश अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण झाला.

ii. पंजाब व हरियाणाच्या मैदानी प्रदेशाचा हरितक्रांतीत लक्षणीय सहभाग आहे.

iii. देशातील शेतीविषयक शिक्षणाबाबतीतही पंजाब व हरियाणाच्या मैदानी प्रदेशाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**११. पंजाब व हरियाणा राज्यांत कोणत्या पिकांची लागवड केली जाते?**

**उत्तर:** पंजाब-हरियाणा राज्यांत गहू, भात, बाजरी, हरभरा, कडधान्ये, कापूस, तेलबिया, ऊस ही पिके प्राधान्याने आढळतात. जलसिंचनाखालील क्षेत्रात गहू, भात, कापूस, ऊस, मका, भुईमूग, मोहरी इ. पिके घेतली जातात, तर जिरायत शेतीत बाजरी, हरभरा, जव इ. पिके घेतली जातात.

**१२. आशियातील सर्वांत मोठे कृषी महाविद्यालय कोणते व ते कोठे आहे?**

**उत्तर:** आशियातील सर्वांत मोठे कृषी महाविद्यालय 'चौधरी चरणसिंग हरियाणा कृषी महाविद्यालय' हे हरियाणातील हिस्सार येथे आहे.

**१३. पंजाबमधील कोणत्या नद्यांवर जलविद्युत प्रकल्प उभारलेले आहेत?**

**उत्तर:** पंजाबमधील बियास व सतलज नद्यांवर जलविद्युत प्रकल्प उभारलेले आहेत.

**१४. पंजाबमधील ज्या भागात कोळशावर आधारित औष्णिक विद्युत केंद्रे उभारलेली आहेत त्यांची नावे लिहा.**

**उत्तर:** कोळशावर आधारित औष्णिक विद्युत केंद्रे पंजाबमधील फरिदाबाद, पानिपत, रूपनगर आणि भटिंडा येथे आहेत.

**१५. 'जलविद्युत' म्हणजे काय?**

**उत्तर:** १. जलऊर्जेच्या साहाय्याने केलेल्या वीजनिर्मितीला 'जलविद्युत' म्हणतात.

२. यात उंचावरून पडणाऱ्या किंवा वाहणाऱ्या पाण्याच्या गुरुत्वाकर्षण शक्तीचा उपयोग करून वीजनिर्मिती केली जाते.

**१६. चुनखडक पंजाब-हरियाणा प्रदेशात कोणत्या भागांत आढळून येतो?**

**उत्तर:** चुनखडक पंजाब-हरियाणा प्रदेशात अंबाला आणि महेंद्रगड या दोन भागांत आढळून येतो.

**१७. पंजाब-हरियाणा या प्रदेशातील लोहमार्गाच्या प्रमुख जंक्शनची नावे सांगा.**

**उत्तर:** अमृतसर, लुधियाना आणि रेवारी ही पंजाब-हरियाणा प्रदेशातील लोहमार्गाची प्रमुख जंक्शन आहेत.

**प्र.३. टिपा लिहा.**

## ४.१ प्राकृतिक रचना

***१. पंजाब-हरियाणाच्या मैदानी प्रदेशाची प्राकृतिक वैशिष्ट्ये.**

**उत्तर:** i. भूवैज्ञानिकदृष्ट्या पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशाची निर्मिती अर्वाचीन काळातील आहे. हिमालयीन नद्यांनी वाहून आणलेल्या गाळापासून या प्रदेशाची निर्मिती झाली आहे.

ii. या प्रदेशाच्या उत्तरेकडील सीमेवर शिवालिक पर्वतरांग असून, दक्षिणेला राजस्थानचे वाळवंट आहे. हा प्रदेश पश्चिमेकडे पाकिस्तान, तसेच पूर्वेकडे दिल्ली रांग (अरवली पवर्तरांगेचा एक भाग) पर्यंत पसरलेला आहे.

iii. हा मैदानी प्रदेश ईशान्येकडे सुमारे २७५ मीटर आणि नैऋत्येकडे सुमारे १७५ मीटर उंच आहे.

iv. हा मैदानी प्रदेश सुपीक आहे. अनेक नद्या आणि विस्तृत जलसिंचन कालवे प्रणालींचा हा जलोढ गाळाचा प्रदेश आहे.

v. या मैदानी प्रदेशाच्या ईशान्येस हिमालयाच्या पायथ्यालगत उंचसखल टेकड्या आहेत.

vi. या टेकड्यांची समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची सुमारे ३०० मीटर इतकी आहे.

vii. या मैदानी प्रदेशाचा नैऋत्येचा भाग अंशतः शुष्क असतो. हा भाग अंतिमतः राजस्थानच्या वाळवंटात विलीन होतो.

**२. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशातील जलनिस्सारण व्यवस्था.**

**उत्तर:** i. रावी, बियास आणि सतलज या नद्यांद्वारे पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशातील उत्तरेकडील भागाचे जलनिस्सारण होते.

ii. या भागात हंगामी छोटे नदीप्रवाह वाहतात. ज्यांना स्थानिक भाषेत 'चोस' म्हणतात, हे प्रवाह शिवालिक पर्वतरांगेतून वाहत येतात.

iii. पावसाळ्यात 'चोस' दुथडी भरून वाहू लागतात व या प्रदेशात पुराचा धोका निर्माण होतो.

iv. यमुना आणि सतलज या दोन नद्यांदरम्यानचा प्रदेश घग्गर नदीच्या खोऱ्याने व्यापला आहे.

v. घग्गर नदी बृहत् हिमालयातून उगम पावते आणि हरियाणातून वाहत जाऊन पुढे राजस्थानात प्रवेश करते.

## ४.३ मृदा

***३. पंजाब-हरियाणाच्या मैदानी प्रदेशातील मृदा.**

**उत्तर:** i. पंजाब-हरियाणाच्या मैदानी प्रदेशातील मृदा प्रामुख्याने गाळाची आहे.

ii. या मैदानी प्रदेशातील दक्षिण भागात हलकी वाळूमिश्रित भरड मृदा आढळते.

iii. बागरच्या पश्चिमेला तांबडी मृदा आढळते.

iv. या मैदानी प्रदेशातील उत्तर आणि पूर्व भागातील मृदेमध्ये चुनखडीचे प्रमाण जास्त आढळते.

## ४.५ लोकसंख्या आणि वसाहती

**४. पंजाब-हरियाणा प्रदेशातील लोकसंख्या.**

**उत्तर:** i. २०११ साली घेतलेल्या जनगणनेनुसार दोन्ही राज्यांची एकूण लोकसंख्या सुमारे ५.३० कोटी एवढी आहे.

ii. येथील एकूण लोकसंख्येच्या साधारण ७२ टक्के लोकसंख्या ग्रामीण आणि विशेषत्वाने शेती करणारी आहे.

iii. औद्योगिकीकरणामुळे शहरीकरणात वाढ झाली आहे.

iv. लोकसंख्येची घनता दर चौकिमी ला ५६१ व्यक्ती इतकी आहे.

v. लुधियाना हे या मैदानी प्रदेशातील सर्वांत मोठे शहर आहे. याशिवाय फरिदाबाद, अमृतसर, जालंधर, पटियाळा इत्यादी महत्त्वाची शहरे आहेत.

***५. पंजाब-हरियाणाच्या मैदानी प्रदेशातील संस्कृती.**

**किंवा**

**पंजाबी संस्कृती. [ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** i. पंजाबची अधिकृत भाषा पंजाबी आहे.

ii. समृद्ध भक्तिगीते, नृत्य, अन्न आणि पोशाख यांसाठी पंजाबी संस्कृती प्रसिद्ध आहे.

iii. ह्या संस्कृतीचे संगीत, भांगडा व गिद्धा नृत्य, पंजाबी गीते आणि पाकक्रिया प्रसिद्ध आहेत.

iv. सर्व धार्मिक सण साजरे केले जातात. लोहरी, बसंत, बैसाखी आणि तीज या सणांतून पंजाबी संस्कृती दिसून येते.

## ४.६ आर्थिक विकास

---

**६. पंजाब-हरियाणामधील जलसिंचन.**

**किंवा**

**पंजाब-हरियाणा मैदानातील जलसिंचन. [जुलै १६]**

**उत्तर:** i. कूपनलिका आणि कालवा सिंचनामुळे पंजाब-हरियाणा हा गाळाच्या मृदेचा प्रदेश समृद्ध झाला आहे.

ii. या प्रदेशातील नद्यांजवळील भागात कालव्यांद्वारे सिंचन केले जाते.

iii. या मैदानी प्रदेशात मोठ्या प्रमाणावरील क्षेत्र जलसिंचनाखाली आहे.

iv. हरियाणाच्या पश्चिम भागात एकही नदी नाही. या प्रदेशातील भूजल साधारणपणे क्षारयुक्त आहे.

v. उत्तरेकडील जिल्ह्यांमध्ये विशेषत: जालंधर व लुधियानामध्ये कूपनलिकांद्वारे जलसिंचन केले जाते.

vi. हरियाणामध्ये यमुना कालव्याच्या उजव्या किनाऱ्याकडील जिल्ह्यांमध्ये विहिरींद्वारे जलसिंचन केले जाते.

**७. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशातील वाहतूक.**

**उत्तर:** i. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशात लोहमार्गाचे जाळे विकसित झाले आहे. या प्रदेशातील सर्व जिल्हे परस्परांना लोहमार्गाने जोडले आहेत.

ii. अमृतसर, लुधियाना आणि रेवारी ही लोहमार्गाची प्रमुख जंक्शन आहेत.

iii. कोलकाता-अमृतसर जोडणारा ग्रँड ट्रंक हा राष्ट्रीय महामार्ग या प्रदेशातून जातो. हा मार्ग पुढे लाहोरपर्यंत जात असल्यामुळे पाकिस्तान बरोबरच्या व्यापारासाठी त्याची मदत होते.

iv. या प्रदेशातील सर्व खेडी आणि शहरे रस्त्यांनी जोडली आहेत.

v. अमृतसर हे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे, त्याचा फायदा पर्यटन व्यवसायाच्या विकासासाठी झाला आहे.

## प्र.४. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा.

### ४.४ नैसर्गिक वनसंपत्ती आणि प्राणिजीवन

***१. पंजाब-हरियाणाच्या मैदानी प्रदेशातील जंगलाचे क्षेत्र अत्यंत कमी आहे.**

**उत्तर:** i. पंजाब-हरियाणाचा मैदानी प्रदेश हा सुपीक गाळाच्या मृदेने तयार झालेला असून यात अनेक नद्या आणि विस्तृत जलसिंचन कालवे आहेत.

ii. त्यामुळे, जास्त क्षेत्र शेतीसाठी वापरले जाते.

iii. शेतीसाठी जमीन उपलब्ध व्हावी यासाठी या प्रदेशात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जाते.

iv. शेतीचे आधुनिकीकरण, वृक्षतोड आणि शुष्क हवामान यांमुळे जंगलाची हानी झाली आहे

म्हणून, पंजाब-हरियाणा प्रांतात जंगलाचे क्षेत्र अत्यंत कमी आहे.

***२. पंजाब-हरियाणाच्या मैदानी प्रदेशाला 'भारताचे धान्य कोठार' म्हणतात.** **[जुलै १६]**

**उत्तर:** i पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशात विस्तीर्ण गाळाची मैदाने आहेत.

ii. कूपनलिका आणि कालवा सिंचनामुळे हा जलोढ गाळाचा प्रदेश समृद्ध झाला आहे.

iii. या प्रदेशात अतिरिक्त आणि विक्रीयोग्य अन्नधान्य पिकवले जाते.

iv. पंजाब-हरियाणा प्रदेशातील एकूण क्षेत्रापैकी लागवडीखालील क्षेत्राची टक्केवारी जास्त आहे.

v. भारतातील हरितक्रांतीत पंजाब आणि हरियाणाच्या मैदानी प्रदेशाचा मोठा वाटा आहे. १९७० मधील हरितक्रांतीमुळे भारत देश अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण झाला.

vi. पंजाब आणि हरियाणा ही दोन राज्ये गहू पिकवण्यात अग्रेसर आहेत.

vii. कृषीसंशोधन, उपक्रमशील शेतकरी, अन्नधान्याचे अतिरिक्त उत्पादन यांमुळे हा प्रदेश 'भारताचे धान्य कोठार' ठरला आहे.

## ४.७ नैसर्गिक आपत्ती व पर्यावरणीय समस्या

***३. पंजाब प्रदेशातील मृदा क्षारयुक्त होत आहे.**

**उत्तर:** i. पंजाबमधील बहुतांश प्रदेश कालवा सिंचनाखाली आहे. अतिरिक्त जलसिंचनाचा परिणाम पाणी साचून राहण्यात होतो.

ii. कालव्यांमधून पाणी झिरपते व भूजल पातळी वाढते.

iii. पाणी साठण्याच्या समस्येमुळे काही ठिकाणी अल्कली मृदेत भर पडत आहे.

iv. वाढत्या भूजलातून क्षार वर येतात, पाण्याचे ऊर्ध्वपातन झाले, की क्षार तसेच जमिनीवर साचून राहतात.

v. क्षारयुक्त मृदा ही या प्रदेशातील मुख्य समस्या आहे, त्यामुळे मृदेच्या सुपीकतेवर विपरीत परिणाम होतो.

## प्र.५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

### ४.२ हवामान

***१. पंजाब-हरियाणाच्या मैदानी प्रदेशातील हवामानाच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करा.** [मार्च १५]

**उत्तर:** i. पंजाब-हरियाणाच्या प्रदेशातील हवामान मान्सून प्रकारचे आहे. इथे कोरडा थंड हिवाळा व उष्ण उन्हाळा असतो.

ii. कमालीचे उष्ण आणि कमालीचे थंड तापमान हे येथील हवामानाचे वैशिष्ट्य आहे.

iii. या मैदानी प्रदेशाची वार्षिक तापमान कक्षा २° से. ते ४०° से. एवढी आहे.

iv. या प्रदेशात मे आणि जून महिन्यांत उष्ण व कोरडे वारे वाहतात. स्थानिक भाषेत या वाऱ्यांना 'लू' म्हणतात. काही वेळा 'लू' चे रूपांतर धुळीच्या वादळांत होते व कधी कधी या वाऱ्यांमुळे पाऊस पडतो.


v. शिवालिक पर्वतरांगांच्या जवळ पर्जन्यमान सुमारे ९५० मिमी, तर राजस्थानच्या वाळवंटाच्या सीमेवर सुमारे ३३० मिमी असते.

vi. अंबाला येथे सुमारे ९५० मिमी, तर हिस्सार येथे सुमारे ४६० मिमी पर्जन्य असते.

vii. बहुतांश पाऊस जुलै ते सप्टेंबर दरम्यान पडतो.

viii. या प्रदेशात हिवाळ्यामध्ये डिसेंबर ते मार्च दरम्यान पश्चिमी आवर्तामुळे पाऊस पडतो. रब्बी पिकांसाठी हा पाऊस उपयुक्त ठरतो.

ix. क्वचित पडणारा गारांचा वादळी पाऊस पिकांना हानिकारक ठरतो.



## ४.४ नैसर्गिक वनसंपत्ती आणि प्राणिजीवन

**२. पंजाब-हरियाणा प्रदेशात आढळून येणाऱ्या नैसर्गिक वनसंपत्तीची माहिती लिहा.**

उत्तर: i. पंजाब-हरियाणाच्या मैदानी प्रदेशात प्रामुख्याने शुष्क, काटेरी झुडपांसह पानझडी वृक्ष व लहान झुडुपे आढळतात.

ii. निलगिरी, देवदार, किकर, शिसव आणि बाभूळ हे येथे आढळणारे वृक्ष आहेत.

iii. शुष्क हवामान आणि वृक्षतोडीमुळे येथील जंगलांची हानी झाली आहे.

iv. पानझडी वृक्ष बहुसंख्येने उत्तरेकडील भागात आढळून येतात.

v. शिवालिक हा भाग वैविध्यपूर्ण वनस्पती व प्राण्यांच्या बाबतीत समृद्ध आहे.

vi. शिवालिक रांगांच्या पायथ्याजवळ शिसव हे वृक्ष आढळून येतात.

vii. पंजाबमधील पटियाळाच्या जवळपास सर्वत्र ढाक वृक्ष बहुसंख्येने आढळतात.

[प्रश्न क्र. ५(१) चा नकाशा पाहावा.]

**३. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशात आढळून येणाऱ्या प्राणिजीवनाची माहिती लिहा.**

**उत्तर:** i पंजाबमध्ये अनेक पाणथळ जागा, पक्षी अभयारण्य आणि प्राणी संग्रहालये आहेत.

ii. यामध्ये हरी-के-पत्तन राष्ट्रीय पाणथळीचा प्रदेश व तरण तारण साहिब जिल्ह्यातील हरी-के-पत्तन येथील वन्यप्राणी अभयारण्य यांचा समावेश होतो.

iii. येथील स्थानिक नद्यांमध्ये मगरी आढळतात.

iv. दक्षिणेकडील उष्ण मैदानी प्रदेशात उंट चांगले पोसले जातात.

v. येथील नद्यांलगतच्या प्रदेशांत म्हशींचे कळप पोसले जातात.

vi. पंजाबच्या ईशान्येकडील भागात घोडे पाळले जातात.

vii. सस्तन प्राण्यांमध्ये अंगावर मऊ लव असणारे प्राणी उदा. उदमांजर, हॉग हरिण, रानमांजर, खार, बिबट्या, नीलगाय, काळवीट, कोल्हा आणि मुंगूस हे प्राणी अभयारण्यात आढळतात.

[प्रश्न क्र. ५(१) चा नकाशा पाहावा.]

**४. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशातील शेतीची माहिती लिहा.**

**उत्तर:** i. विस्तीर्ण गाळाची मैदाने आणि चांगल्या तऱ्हेने विकसित केलेली कालवे प्रणाली यांमुळे हा प्रदेश 'भारताचे धान्यकोठार' ठरला आहे.

ii. या प्रदेशात अतिरिक्त आणि विक्रीयोग्य अन्नधान्य पिकवले जाते.

iii. कृषीसंशोधन आणि उपक्रमशील शेतकऱ्यांमुळे येथे शेतीची प्रगती झाली आहे.

iv. एकूण क्षेत्रापैकी लागवडीखालील क्षेत्राची टक्केवारी जास्त आहे.

v. पिकांमधील वैविध्य आणि अन्नधान्याचे अतिरिक्त उत्पादन ही येथील शेतीची वैशिष्ट्ये आहेत. गहू, भात, हरभरा, कडधान्ये, बाजरी, तेलबिया,

कापूस आणि ऊस ही या प्रदेशात प्राधान्याने आढळणारी पिके आहेत.

vi. गहू, तांदूळ, कापूस, ऊस, मका, भुईमूग, मोहरी ही पिके जलसिंचनाखालील क्षेत्रात घेतली जातात, तर जिरायत शेतीत बाजरी, हरभरा, जव इ. पिके घेतली जातात.

vii. पंजाब-हरियाणा ही दोन राज्ये गहू पिकविण्यात भारतात अग्रेसर आहेत.

viii. भात हे येथील दुसरे महत्त्वाचे पीक आहे.

ix. संपूर्ण भारतात पंजाबमध्ये दर हेक्टरी कापसाचे उत्पादन सर्वांत जास्त आहे.

x. या प्रदेशात यांत्रिक शेती पद्धती मोठ्या प्रमाणावर राबविली जाते. शेतीविषयक कामे करण्यासाठी ट्रॅक्टरचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो.

xi. अळंबीची शेती ही या प्रदेशातील अलीकडची प्रगती आहे.

[प्रश्न क्र. ५(१) चा नकाशा पाहावा.]

***५. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशातील दूध उत्पादन व्यवसायाची माहिती लिहा.** **[मार्च १४]**

**उत्तर:** i. पंजाब-हरियाणा राज्यात शेतीशिवाय पशुपालन व दुग्धव्यवसाय हे महत्त्वाचे उद्योग आहेत.

ii. हरियाणा जातीचे बैल आणि मुऱ्हा जातीच्या म्हशी नैऋत्येकडील शुष्क प्रदेशातील जिल्ह्यात आढळतात.

iii. अमृतसर हे दूध संकलन करण्याचे अग्रगण्य केंद्र आहे. येथून चंदीगढ व सिमला येथे दुधाचा पुरवठा केला जातो.

iv. दुग्धोत्पादने बनविण्यासाठी आधुनिक दुग्धव्यवसाय अमृतसर, लुधियाना व रोहतक जिल्ह्यांमध्ये सुरू झाला आहे.

[प्रश्न क्र. ५(१) चा नकाशा पाहावा.]

***६. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशातील औद्योगिक विकासाचे वर्णन करा.** **[मार्च १६]**

**उत्तर:** i. पंजाब-हरियाणा प्रदेश मूळचा शेतीप्रधान प्रदेश आहे.

ii. या प्रदेशात सुती व लोकर कापडनिर्मिती, खते, हलकी अभियांत्रिकी सामग्री, रेल्वेइंजिन, कागद, साखर इत्यादी मोठे उद्योग आहेत.

iii. या प्रदेशात लघुउद्योगांमध्ये सायकल, क्रीडा-साहित्य, हातमाग, होजिअरी इत्यादींची निर्मिती केली जाते.


iv. स्वातंत्र्यानंतरच्या काळात लघुउद्योगधंद्यांना चालना मिळाली.

v. सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत, भाक्रा-नांगल प्रकल्पातून निर्माण झालेली मोठ्या प्रमाणातील ऊर्जा आणि गृहोपयोगी वस्तूंना मिळणारी चांगली बाजारपेठ या सर्वांमुळे या प्रदेशातील औद्योगिकीकरणाचा मार्ग सुकर झाला.

vi. अमृतसर हे कापडनिर्मिती, यांत्रिक हत्यारे आणि अन्नप्रक्रिया उद्योग यांसाठी प्रसिद्ध आहे.

vii. क्रीडासामग्रीच्या उद्योगधंद्यामध्ये जालंधर अग्रेसर आहे.

viii. अंबाला हे सर्वांत मोठ्या प्रमाणावर शास्त्रीय उपकरणांची निर्मिती करणारे शहर आहे, म्हणून त्यास 'विज्ञान शहर' म्हणतात.


भारत
पंजाब-हरियाणा औद्योगिक शहरे
उ
अमृतसर
चंदीगढ
पंजाब
अंबाला
पानिपत
हिस्सार
फरिदाबाद
हरियाणा
बंगालचा उपसागर
अरबी समुद्र
अंदमान व निकोबार बेटे
लक्षद्वीप बेटे
हिंदी महासागर

## प्र.६. नकाशा वाचन

**भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील आकृती क्र. ४.१ पृष्ठ क्रमांक ३४ वरील आकृतीचे निरीक्षण करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशाच्या पूर्व सीमेवरून कोणती नदी वाहते?**

**उत्तर:** पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशाच्या पूर्व सीमेवरून यमुना नदी वाहते.

**२. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशाचा कोणता उपविभाग ईशान्येकडे आढळून येतो?**

**उत्तर:** पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशाचा भाबर हा विभाग ईशान्येकडील भागात येतो.

**३. सतलज नदीच्या उपनदीचे नाव लिहा.**

**उत्तर:** बियास नदी ही सतलज नदीची उपनदी आहे.


**४. हा नकाशा काय दर्शवितो आहे?**

**उत्तर:** हा नकाशा पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेश दर्शवितो आहे.

## प्र.७. भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी दाखवा आणि त्यांना नावे द्या. (सूची आवश्यक)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| *१. | अमृतसर [मार्च १६] | २. | तरण तारण | *३. | चंदीगढ | *४. | बियास नदी |
| ५. | हिस्सार | ६. | मानेसर | ७. | फरिदाबाद | ८. | पानिपत |
| *९. | अंबाला | | | | | | |

**उत्तर:** वरील बाबी खालील नकाशात दर्शविल्या आहेत:



भारत
उ.
० २०० ४०० किमी
(१)
(२)
(३)
(४)
(५)
(६)
(७)
(८)
(९)
बंगालचा उपसागर
अरबी समुद्र
लक्षद्वीप बेटे
हिंदी महासागर
अंदमान व निकोबार बेटे
सूची:
(१) अमृतसर
(२) तरण-तारण
(३) चंदीगढ
(४) बियास नदी
(५) हिस्सार
(६) मानेसर
(७) फरिदाबाद
(८) पानिपत
(९) अंबाला